आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१९ सप्टेंबर २०२५ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- नवे उद्योग सुरू करण्यासाठी लागणारे परवाने कमी करून वेळेची बचत करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश

- विविध स्टील कंपन्यांबरोबर राज्य सरकारचे ८१ हजार कोटी रुपयांचे सामंजस्य करार, ४० हजारापेक्षा जास्त रोजगाराच्या संधी निर्माण होणार

- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेच्या सर्व लाभार्थ्यांना २ महिन्यात केवायसी पूर्ण करणं बंधनकारक

**आणि**

- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा कुसुमाग्रज राष्ट्रीय साहित्य पुरस्कार प्रसिद्ध हिंदी कवी कुमार अंबुज यांना जाहीर

**<><><><><>**

नवीन उद्योग उभारणीसाठी लागणारे परवाने कमी करून वेळेची बचत करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत घेतलेल्या बैठकीत दिले. उद्योगांसाठीच्या सुधारणांची अंमलबजावणी करु नवे उद्योग सुरू करण्यासाठी जलद आणि सुलभ परवाने देणारं उत्कृष्ट उदाहरण देशासमोर ठेवण्याचं आवाहन त्यांनी केलं.

उद्योगासाठी लागणाऱ्या बऱ्याच परवानग्या अनेक विभागांशी संबंधित असतात. अशावेळी एकाच अर्जामध्ये संबंधित सर्व परवानग्या देण्याची व्यवस्था करावी.  पुन्हा अर्ज करण्याची वेळ उद्योजकावर येणार नाही, याची काळजी घ्यावी, असं त्यांनी सांगितलं. नगरविकास विभागाने उद्योगांना लागणाऱ्या इमारत बांधकाम परवानगीसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित ऑनलाईन यंत्रणा विकसित करावी. नियमानुसार बांधकाम परवानगीसाठी अर्ज केल्यावर या यंत्रणेद्वारे आवश्यक

कागदपत्रांची पूर्तता करून घेऊन संबंधिताला बांधकाम परवानगी मिळेल, असे क्रियान्वयन यातून तयार करावे. ही प्रणाली ' ऑटो सिस्टीम' वर कार्यवाही करून अर्जदाराचा वेळ वाचवावा, असं ते म्हणाले.

हरित श्रेणीत येणाऱ्या उद्योगांना ठराविक कालावधीपर्यंत पुन्हा परवाना घेण्याची वेळ येणार नाही, याची खबरदारी घेण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

**<><><><><>**

मुंबईत आज आयफा स्टील महाकुंभ या कार्यक्रमात महाराष्ट्र शासनानं विविध स्टील कंपन्यांबरोबर जवळपास ८१ हजार कोटी रुपयांचे सामंजस्य करार केल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. या करारांमुळे ४० हजारापेक्षा जास्त रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत. गडचिरोली, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, रायगड, छत्रपती संभाजीनगर, साताऱ्यात हे प्रकल्प येणार आहेत. यातून राज्यातल्या स्टील उद्योगाला चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

## होल्ड कॅप्सूल

*(मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांच्या हस्ते आज आयफा स्टीलेक्स २०२५ चं मुंबईत उद्घाटन झालं. राज्यातल्या स्टील उद्योगात आतापर्यंत ८० हजार कोटींची गुंतवणूक आली आहे. नक्षलवाद्यांच्या प्रभावानं ओळखलं जाणारं गडचिरोली पुढे देशाची नवी स्टील सिटी होईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. हरित स्टील क्षेत्रात राज्याला आघाडीवर आणायचा संकल्पही असल्याचा संकल्प मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.*

***होल्ड… बाईट- देवेंद्र फडणवीस***

*गडचिरोलीत उद्योगसाठी जमीन अधिग्रहित करायला गरजेनुसार अधिकारी उपलब्ध करून देऊ, मात्र ठरलेल्या वेळेत उद्योग उभारून तिथं रोजगार वाढवा, असं आवाहन राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी यावेळी केलं.*

*देशात वर्ष २०३० पर्यंत ३० कोटी टन स्टील उत्पादनाचं लक्ष्य ठेवलं असून त्यापैकी किमान ५ कोटी हरित टन स्टील निर्यात करायचं उद्दिष्ट असल्याची माहिती नूतन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी यांनी दिली. जगातल्या कार्बन कर धोरणांमुळे ग्रीन स्टील आता अपरिहार्य ठरत असल्याचं ते म्हणाले.)*

**<><><><><>**

गुणवत्तापूर्ण आणि नाविन्यपूर्ण शिक्षण उपक्रमांना चालना देण्यासाठी काम करणाऱ्या जिल्हा परिषद आणि महानगरपालिकांना ५ कोटी, ३ कोटी आणि २ कोटी रुपयांची प्रोत्साहनपर पारितोषिकं देण्यात येतील, अशी घोषणा शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी आज पुण्यात केली. राज्यस्तरीय शालेय शिक्षण

परिषदेचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. विद्यार्थ्यांना ऐतिहासिक स्थळांचं महत्त्व कळावं, शेतीतल्या कामांचं निरीक्षण करता यावं, बँकेचे व्यवहार समजावेत यासाठी शैक्षणिक सहली काढण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

<><><><><>

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेच्या सर्व लाभार्थी महिलांना केवायसी प्रकिया सुलभपणे पूर्ण करण्यासाठी ई-केवायसी सुविधा देण्यात आली आहे. या योजनेतून लाभ मिळालेल्या महिलांनी दोन महिन्याच्या आत केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी, असं आवाहन राज्याच्या महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी केलं आहे. ladakibahin.maharashtra.gov.in या पोर्टलवर ई-केवायसी सुविधा दिली आहे. योजनेतली पारदर्शकता कायम रहावी आणि पात्र लाभार्थ्यांना नियमित लाभ मिळावा यासाठी ही प्रक्रिया पूर्ण करावी असं तटकरे यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

राज्यातल्या जिल्हा परिषदेत कार्यरत अधिकारी, कर्मचारी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्या दिव्यांगत्वाच्या प्रमाणपत्राची पडताळणी होणार आहे. या प्रमाणपत्रांच्या तपासणीनंतरच लाक्षणिक दिव्यांगत्व असलेल्यांनाच शासनमान्य लाभ देण्यात येणार आहेत. तपासणीत बनावट आणि नियमबाह्य प्रमाणपत्र घेतलेल्यांना किंवा ४० टक्क्यांपेक्षा कमी दिव्यांगत्व आढळलं, तर संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

<><><><><>

राज्यातल्या शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या विकासासाठी शासनाकडून दिल्या जाणाऱ्या अनुदानाचा पहिला हप्ता थेट ग्रंथालयांच्या बँक खात्यात जमा करण्याची प्रक्रिया सुरू झाल्याची माहिती उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज दिली.

**<><><><><>**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्था अर्थात बार्टीनं विकसित केलेल्या ऑनलाइन पोर्टलद्वारे राज्यात गेल्या आठ महिन्यांत ३ लाख ४१ हजारापेक्षा जास्त विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्रं वितरित केल्याची माहिती बार्टीचे महासंचालक सुनील वारे यांनी आज दिली.

**<><><><><>**

भाडेतत्वावर दिलेल्या सदनिकांवर देखभाल शुल्क म्हणून अतिरिक्त सेवा शुल्क आकारणं बेकायदा असल्याचा निर्णय पुणे इथल्या सहकारी संस्थेच्या उपनिबंधकांनी दिला आहे. सहकारी संस्थांमधल्या भाड्याने दिलेल्या सदनिकांवर काही ठिकाणी नियमित देखभाल शुल्काबरोबर दहा टक्के अतिरिक्त सेवा शुल्क आकारले जाते. भाड्याने दिलेल्या सदनिकांसाठी वेगळे किंवा अतिरिक्त शुल्क आकारण्यासाठीची कोणतीही तरतूद कायद्यात नाही म्हणून भाड्याने दिलेल्या सदनिकांच्या मालकांवर वेगळ्या बिनभोगवटा शुल्काची आकारणी करु नये असं उपनिबंधकांनी दिलेल्या आदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

जीएसटी परिषदेनं अनेक वस्तू आणि क्षेत्रांमधले जीएसटीचे दर कमी केले आहेत. यामुळं अनेक वाहने स्वस्त होणार आहेत. दुचाकी तयार करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या भागांवर लागणारा जीएसटी सरकारनं २८ टक्क्यांवरून १८ टक्के इतका केला आहे. तसंच, १० प्रवासी क्षमता असलेल्या बसवरचा जीएसटीही २८ वरून १८ टक्के करण्यात आला आहे. अठराशे सीसीची क्षमता असलेल्या ट्रॅक्टरवरही आता ५ टक्के जीएसटी लागणार असून यामुळे देशांतर्गत मागणी आणि निर्यातीला प्रोत्साहन मिळेल, असा अंदाज आहे. या दरकपाती विषयी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी म्हणाले…

**होल्ड… बाईट- ललित गांधी (२९ सेकंद)**

**<><><><><>**

सेवा आणि सुशासनाच्या मार्गावरून चालताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार देशाच्या सर्व समावेशक प्रगतीसाठी प्रयत्नशील आहे. देशातल्या महिला सक्षमीकरणासाठी केंद्र सरकारने उचललेल्या पावलांविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून....

**होल्ड.. व्हॉईस कास्ट**

*(गेल्या ११ वर्षांत केंद्र सरकारने सामाजिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रात महिलांना सक्षम करण्यासाठी व्यापक धोरण आखलं आहे. नारीशक्ती या अभियानामुळे महिलांना सन्मान, सुरक्षा आणि स्वावलंबन प्रदान केलं आहे. हिंसाचार तसंच लिंगाधारित भेदभावापासून घटनात्मक संरक्षण ते परिवर्तनकारी योजनांपर्यंत महिलांच्या विकासासाठी केंद्र सरकारने विशेष प्रयत्न केले आहेत. बेटी बचाओ, बेटी पढाओ या योजनेमुळे लिंग गुणोत्तरात लक्षणीय फरक दिसून आला आहे. जानेवारी २०१५मध्ये सुरू झालेल्या सुकन्या समृद्धी योजनेमुळे भारतातल्या अनेक तरुणींना सक्षमीकरणासाठी मदत मिळाली आहे. लखपती दीदी मोहिमेमुळे स्वयंसहायता गटांना दरवर्षी किमान एक लाख रुपये उत्पन्नाची हमी मिळाली आहे. या विविध योजनांमुळे तळागाळातल्या प्रशासन व्यवस्थेपासून ते संरक्षण दल, विमान वाहतुकीपर्यंत महिला आता सर्वच क्षेत्रात नेतृत्व करत आहेत.*

***होल्ड.. बाईट- प्रधानमंत्री)***

**<><><><><>**

सोलापूर जिल्ह्यात सेवा पंधरवड्याच्या अंतर्गत नागरिकांनी विविध योजनांचा लाभ घेण्याचं आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केलं आहे. या सेवा पंधरवड्यांतर्गत अनेक गावातली पाणंद, शिवार, शेतरस्ते, पायवाटांचा शोध घेऊन त्यांच्या नोंदी सातबाऱ्यावर करण्यात येतील. ज्या गावांना स्मशानभूमी नाहीत, तिथे त्या तयार करण्यात येतील. तसंच जिल्हा प्रशासनाकडे प्रलंबित असलेल्या विविध नोंदी या पंधरवड्यात घेतल्या जाणार आहेत.

**<><><><><>**

सेवा पंधरवड्याच्या निमित्ताने सिंधुदुर्ग जिल्हा प्रशासनामार्फत 'शाळा तिथे दाखला' उपक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत विद्यार्थ्यांना लागणाऱ्या दाखल्यांसाठी महसूल विभाग शाळेतून अर्ज भरुन घेतल्यानंतर आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करुन दोन ते चार दिवसात दाखले वितरीत करेल अशी माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात आज प्रेरणा दिन साजरा

करण्यात आला. यानिमित्त सिंधुदुर्गाच्या जिल्हाधिकाऱ्यांनी पडतेवाडी इथल्या शाळेला भेट दिली.

**<><><><><>**

मुंबईतल्या अटल सेतुवरच्या २ किलोमीटरच्या टप्प्यात पडलेल्या खड्ड्यांची MMRDA चे अतिरीक्त महानगर आयुक्त विक्रम कुमार यांनी पाहणी केली. जोरदार पाऊस आणि अविरत वाहतुकीने हे खड्डे पडले आहेत. ५ दिवसात हे खड्डे दुरुस्त करण्याचे आदेश कंत्राटदाराला दिले असून १ कोटी रुपयांचा दंड ठोठावल्याची माहिती प्राधिकरणानं दिली आहे.

**<><><><><>**

नाशिकमधल्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाकडून दिला जाणारा कुसुमाग्रज राष्ट्रीय साहित्य पुरस्कार प्रसिद्ध हिंदी कवी कुमार अंबुज यांना जाहीर करण्यात आला आहे. एक लाख रुपये रोख, मानचिन्ह आणि मानपत्र असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. दरवर्षी एका निवडक अ-मराठी कवीला हा पुरस्कार दिला जातो. येत्या बुधवारी नाशिकमध्ये पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे. कवी कुमार अंबुज यांचे आतापर्यंत ५ काव्यसंग्रह प्रकाशित झाले असून त्यांना यापूर्वी मध्यप्रदेश साहित्य अकादमीच्या पुरस्कारासह अनेक पुरस्कार मिळाले आहेत.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षानं विविध मुद्द्यांवर पक्षाचे मंत्री, खासदार, आमदार आणि इतर सदस्यांच्या अध्यक्षतेखाली विविध समित्या स्थापन केल्या आहेत. या विषयांवर समित्यांच्या माध्यमातून मागील वाटचाल आणि आगामी कार्यपद्धती यावर ठोस धोरणात्मक आराखडा तयार केला जाणार आहे. सरकार आणि पक्षातला समन्वय परिणामकारक करणे, जनतेशी संवाद साधण्याची धोरणे

यासारख्या मुद्द्यांवर या नागपुरातल्या चिंतन शिबिरात चर्चा झाल्याची माहिती पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांनी दिली.

-<><><><><>

बीडमधल्या केज इथं आज तहसील कार्यालयावर ओबीसींचा महामोर्चा काढण्यात आला होता. ओबीसी नेते लक्ष्मण हाके यात सहभागी झाले होते.

<><><><><>

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत आज भारताचा सामना ओमानशी होणार आहे. अबूधाबीच्या शेख झायेद मैदानावर रात्री आठ वाजता हा सामना सुरू होईल. ओमानबरोबर भारताचा सामना पहिल्यांदाच होणार आहे.

दरम्यान, अफगाणिस्तानचा सहा गडी राखून पराभव करून श्रीलंकेनं सुपर फोरमध्ये प्रवेश केला आहे. अफगाणिस्ताननं विजयासाठी दिलेलं १७० धावांचं उद्दिष्ट श्रीलंकेनं सहा गडी आणि आठ चेंडू राखून पार केलं.

<><><><><>

येत्या चोवीस तासात कोकण आणि विदर्भात बऱ्याच ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. राज्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे.

<><><><><>

गेल्या ३ दिवसांपासून तेजीत असलेले देशातले शेअर बाजार आज कोसळले. माहिती तंत्रज्ञान आणि बँकिंग क्षेत्रातल्या समभागांमध्ये आज नफेखोरी झाली. त्याचवेळी हिंडेनबर्ग प्रकरणी निर्दोष असल्याचा निकाल सेबीनं दिल्यानं अदानी समुहाचे समभाग वधारले.

//<><><><><>//